प्रेस नोट ०६/०५/२०१९

## रिक्षामध्ये लिफ्ट देवुन प्रवाशांची लुट करण्याऱ्या टोळीला हडपसर पोलीसांकडुन अटक

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३८५/२०१९ भादविक ३९५ मधील फिर्यादी मोहसीन नासीर शेख वय ४५ वर्षे रा. उरुळीकांचन ता. हवेली जि पुणे हे दिनांक ५/५/२०१९ रोजी पुणे रेल्वे स्टेशन येथुन उरुळी येथे एम. एच १२ एन डब्ल्यु १२०४ या रिक्षाने जात असताना रात्री ०२.३० वाजता आकाशवाणी जवळ हडपसर येथे यातील रिक्षाचालक यांनी व त्याचे साथीदारांनी संगणमत करुन दारुसाठी पैशाची मागणी केली असता फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला असता त्यांना दगड मारुन जखमी केले व इतर साथीदारांना मिसकॉल करुन पाच इसमांना दोन मोटार सायकलवर बोलावुन घेवुन फिर्यादीस कोयत्याचा धाक दाखवुन फिर्यादीच्या खिशातील रोख सातशे रुपये व सॅमसंग मोबाईल जबरदस्तीने चोरुन नेला आहे. म्हणुन फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल होता.

हडपसर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी संजय चव्हाण व कर्मचारी पो. ना. ६४८९ शिवले व पो. शि. ८६९२ शेख यांनी दाखल गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करुन, वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार आरोपी नामे १) गौरव शिवराम गायकवाड वय १९ वर्षे रा.टाळगाव चिखली,श्री रोड पॅराडाईज शेजारी, टाळ मंदिर शेजारी,पुणे २) जयदीप नविनकुमार शहा वय १९ वर्षे रा. भुजबळ वस्ती, चक्रेश्वर रोड, चार भुजा सोसायटी, चाकण. पुणे, ३) शुभम तात्या काळे वय १९ वर्षे रा. माऊली कॉलनी,गल्ली नं.९अष्टविनायक किराणा दुकानजवळ, गंगानगर, फुरसुंगी पुणे, ४) अंकीत शिवाजी राऊत वय २६ वर्षे, रा. तुकाईदर्शन, लेन नं. ५पाण्याची टाकीजवळ, फुरसुगी पुणे. ५) अमोल राजु शिंदे वय २१ वर्षे रा. अष्टविनायक कॉलनी,गल्ली नं. ५ अजय कामठे यांचे बिल्डींगमध्ये,गंगानगर,फुरसुंगी पुणे.६) रोहित दिपक भोसले वय २४ वर्षे रा.जय भवानी कॉलनी नं. ४ ताम्हाणे गिरणी शेजारी, गंगानगर फुरसुंगी पुणे असे एकुण ०६ आरोपीतांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी यांचेकडून गुन्हयात वापरलेले एकुण किंमत रुपये १,७०,०००/- रुपयेचे एक रिक्षा, दोन मोटार सायकली व चार मोबाईल फोन असा मुददेमाल गुन्हयाचे पुरावेकामी जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, दिलीप गाडे, प्रसाद लोणारे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो. शि. ७६८९ गदादे, पो. शि. ८६८७ माने, पो. शि. ८९०७ नरसाळे, पो. शि. ९०५८ तोरसकर, पो. शि. ६२३८ हागारे, पो. शि. ८२७७ बंडगर, पो. शि. ८६६५ पवार यांनी केली आहे.